# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जा.क्र./आस्था./३८२४/२०१९
दिनांक: २७/१२/२०१९

**परिपत्रक**

अखिल भारतीय स्थानिक संस्थेच्या सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई येथील केंद्रात लोकल सेल्फ गर्व्हमेंट डिप्लोमा (L.S.G.D) व लोकल गर्व्हमेंट सर्व्हिस डिप्लोमा (L.G.S) प्रशिक्षण वर्ग फेब्रुवारी २०२० पासुन सुरु होत आहे.

रेग्युलर एल.जी.एस व एल.एस.जी.डी. प्रशिक्षण वर्ग महिन्याच्या दुस-या,चौथ्या शनिवारी किंवा प्रत्येक रविवारी आणि सार्वजनिक रजेच्या दिवशी सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत होतील.

तसेच महानगरपालिकेतील कर्मचा-यांच्या सोईच्या दृष्टीकोनातून एल.जी.एस व एल.एस.जी.डी.हे कोर्स दूरशिक्षणाव्दारे (DLP) १ वर्षा करिता फक्त वर्षातुन तेरा वेळा महिन्याच्या दुस-या शनिवारी अथवा सुट्टीच्या दिवशी संपर्क कार्यक्रम मध्ये होतील.

सदर प्रशिक्षण वर्गांच्या प्रवेशाची प्रक्रिया फेब्रुवारी पासून सुरु असून या मनपाच्या आस्थापनेवरील इच्छुक अधिकारी / कर्मचारी यांना दि. ०७/०१/२०२० पर्यंत विभाग प्रमुखांमार्फत आस्थापना विभागाकडे अर्ज सादर करावे.

प्राप्त अर्जामधुन सेवाजेष्ठतेप्रमाणे सदर प्रशिक्षणास पाठविले जाईल यांची नोंद घ्यावी.

उप आयुक्त (मुख्यालय)
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

प्रति,
सर्व नियंत्रण अधिकारी
सर्व विभाग प्रमुख
सर्व प्रभाग अधिकारी/कार्यालयीन अधिक्षक

प्रत माहितीस्तव
अध्यक्ष/ सचिव,कामगार कर्मचारी संघर्ष कृती समिती.